226/0/29

जा.क्र. माध्य.३( )/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 23 MAY 2002

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे.
जिल्हा परिषद,

विषय : प्रथम मान्यता. (माध्यम- मराठी) विना अनुदान
शाळा माध्यमिक विद्यालय, गुंजाळवाडी ता. जुन्नर

संदर्भ : १. दि. २२.४.२००२
२. आपले पत्र क्रमांक नमाशा-२००१/१२०९/ २००१ माशि-१, दि. १६.६.२००१
३. माध्य-३/१४/नमाशा/ मान्यता/ पुवि/ २००१, दि. ६.११.२००१

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव जि. पुणे. संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, गुंजाळवाडी ता. जुन्नर माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/~~९ वी व १० वी~~ च्या वर्गास २०००- २००१ या शैक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, विना अनुदान शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वत:च्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.
१५. विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करावी.

स्थळप्रतिवर शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रत : मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, गुंजाळवाडी
ता. जुन्नर जि. पुणे.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./२००१-०२
पुणे, दि. ६/६/२००२

प्रति,

सचिव,

ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव.

ता. जुन्नर.

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता देणेबाबत. ०१-०२

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या माध्यमिक विद्यालय, गुंजाळवाडी या माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी च्या वर्गास मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य-३[१४]/नपाशा/मान्यता/पुवि/२९८५८/०१ दि. ६/७/०१ अन्वये परवानगी देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेत जून २००१ पासून इ. ९ वीच्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

१] स्वतंत्र प्रयोगशाळा असावी.
२] स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय करणेत यावी.
३] शालेय नोंदवह्या अद्ययावत नियम ८२ नुसार असाव्यात.
४] अध्यापनात शै. साधनांना वापर असावा.
५]
६]

मा. शि. अ. यांची
मान्य टिपणी.

J.N.Hande
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे.

प्रत,

१. मुख्याध्यापक,

माध्यमिक विद्यालय, गुंजाळवाडी.

ता. जुन्नर.

जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै. वा./०२-०३
पुणे, दि. ६/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव.
ता. जुन्नर, जि. पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३
~~इ. ६ वी~~, ~~इ. ७ वी~~, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या ग्रामोन्नती मंडळ, नारायणगाव
या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित माध्यमिक विद्यालय, गुंजाळवाडी
माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी / ~~इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/२९८५८/०१, दि. ८/११/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. / सन ०१-०२ पासून इ.९ वीच्या वर्गास व सन २००२-२००३ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी, इ. ९ वी~~, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देण्यात येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित ~~उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे~~ / गट शिक्षणाधिकारी, पं. स. जुन्नर. यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणे यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

J. N. H. [signature]
शिक्षणाधिकारी[माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.